# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** कराड शहर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0980 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/10/2022 17:36 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 14/09/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/09/2022

**Time From (वेळेपासून):** 15:59 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/10/2022 **Time (वेळ):** 16:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 033 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/10/2022 17:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिलदार कार्यालय कराड ,कराड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शुभम तानाजी बागडी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 104,एनके प्लाझा फ्लट , सीपीआर हस्पीटल जवळ,कोल्हापुर, ता करवीर, ,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 104,एनके प्लाझा फ्लट , सीपीआर हस्पीटल जवळ,कोल्हापुर, ता करवीर, ,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-7720946464**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विक्रम शिवदास | | | 1. कराड ताकराड ,कराड शहर,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब ता.31.10.2022मी शुभम तानाजी बागडी, वय -33 वर्षे, व्यवसाय- हटेल, रा. एन.के प्लाझा फ्लट 104, सीपीआर हस्पीटल जवळ, कोल्हापुर, ता करवीर, जि. कोल्हापुर मोबाईल नंबर. 7720946464मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझी बहीण सौ स्नेहल हीचे मुळ गांव बेलवडे बुद्रुक ता कराड हे असुन ती व तिचे पती स्वाधीन माने असे त्यांचे कुटुंबासह ताराबाई पार्क कोल्हापुर येथे राहणेस आहेत. माझी भाची कुमारी श्रीवा हीचे नावाचा कुनबी दाखला काढण्यासाठी माझे दाजी स्वाधीन माने यांनी तहसिलदार कार्यालय कराड येथे सुमारे महीन्यापुर्वी अर्ज केलेला आहे. मी कोल्हापुर येथे राहणेस असल्यामुळे माझे बहीणीचे पती स्वाधीन माने यांनी मला भाची श्रीवा हीचा कुनबी दाखला तहसिलदार कार्यालय कराड येथून घेणे बाबत मला सांगीतले आहे. त्याप्रमाणे मी तहसिलदार कार्यालय कराड येथे जावुन दि. 07.09.2022 रोजी भाची श्रीवा हिचे कुनबी सर्टिफिकेट बाबत निवासी नायब तहसिलदार आनंदराव देवकर यांची भेट घेतली त्यावेळी देवकर साहेबांनी मला सेतु कार्यालयातील विक्रम शिवदास यांची भेट घेण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी विक्रम शिवदास यांची भेट घेवुन भाची श्रीवा हिचे कुनबी दाखल्या बाबत चौकशी केली असता, विक्रम शिवदास यांनी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला तयार झाला नसल्याचे सांगुन त्याकरीता वेळ लागणार असल्याचे मला सांगीतले. त्यानंतर पुन्हा मी तहसिलदार कार्यालय कराड येथे जावुन विक्रम शिवदास यांची भेट घेवुन भाची श्रीवा हिचे कुनबी दाखल्या बाबत चौकशी केली असता विक्रम शिवदास यांने भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला देतो पण दाखल्यासाठी त्यांना व देवकर साहेबांना 50,000/- रुपये द्यावे लागतील नाही तर कुनबी दाखला मिळणार नाही असे सांगुन विक्रम शिवदास यांनी त्यांचे करीता व देवकर साहेबांचे करीता माझेकडे 50,000/- रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पैसे देण्यास नकार दिला. त्यावेळी त्यांनी पैसे दिल्याशिवाय कुनबी दाखला मिळणार नाही असे मला सांगीतले.श्री.आनंदराव देवकर, निवासी नायब तहसिलदार कराड व सेतु कार्यालयातील विक्रम शिवदास हे माझ्याकडून पैसे घेतल्याशिवाय माझ्या भाचीचे नांवाचा कुनबी दाखला देणार नसल्याची माझी खात्री झाल्याने व मला आनंदराव देवकर व विक्रम शिवदास यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने माझा मित्र तौसिफ शेख यांने दि.13.09.2022 रोजी मा. राजेश बनसोडे साहेब पोलीस अधीक्षक, अन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना संपर्क करुन तक्रार कळवली. त्यावेळी बनसोडे साहेबांनी सांगली युनिटचे अधिकारी पुढील कारवाई करतील व ते तुम्हाला संपर्क करतील असे मित्र तौसिफ यांना सांगीतले. त्यानंतर काही वेळात सांगली युनिटचे सुजय घाटगे साहेब यांनी संपर्क करुन पोलीस निरीक्षक श्री पुजारी साहेबांचा मोबाईल नंबर दिला. दि.14.09.2022 रोजी पुजारी साहेबांनी तौसीफ शेख याला संपर्क करुन माहिती घेतली. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व मित्र तौसिफ याला गोपनियता राखण्याच्या सुचना देवुन कराड एस.टी. स्टन्डचे पाठीमागे येत असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे दि.14.09.2022 रोजी श्री. पुजारी साहेब त्यांचे पथकासह कराड एस.टी. स्टन्डचे पाठीमागील रोडवर आले होते. त्यावेळी मी व मित्र तौसिफ शेख यांनी त्यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. पुजारी साहेब यांनी त्यांचे सोबत आलेले दोन शासकीय पंच तसेच त्यांचा स्टाफ यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी श्री. आनंदराव देवकर, निवासी नायब तहसिलदार कराड व श्री विक्रम शिवदास, सेतु

कार्यालय कराड यांचे विरुध्दचा लाच मागणी केले बाबतचा माझे हातास दुखापत झाली असल्याने माझा मित्र तौसिफ शेख यांने लिहीलेला तक्रारी अर्ज श्री. पुजारी साहेब यांना दिला. पुजारी साहेब यांनी मला त्यांचे ब्युरोच्या कार्यप्रणाली प्रमाणे सविस्तर माहिती दिली.पुजारी साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री संदीप रंगराव देसाई यांनी पंच नं 1 व गणेश धर्मा राठोड यांनी पंच नं 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर पुजारी साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला त्यांनी तो वाचून त्यावर सह्या केल्या. पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर बाबत माहिति देवून त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. पुजारी साहेबांनी मला व पंच देसाई यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे दुपारी चार वाजण्याचे सुमारास मी व पंच देसाई असे माझ्याकडील मारुती स्विफ्ट कार नं एम.एच. 09 ईयु 5657 मधुन रवाना होवून तहसिलदार कार्यालय कराड येथे गेलो. मी माझेकडील कार पार्कीग ठिकाणी पार्क करून मी व पंच देसाई असे तहसिलदार कार्यालयातील तिसरे मजल्यावरील सेतु कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी विक्रम शिवदास बसलेल्या खुर्चीच्या समोरील टेबलजवळ मी व पंच देसाई गेलो, सदर ठिकाणी लोकांची गर्दी होती. आम्ही काही वेळ थांबुन राहीलो. त्यानंतर मी विक्रम शिवदास याला आज लई कामात असाल तर उद्या येवु का? असे विचारले असता त्याने मला झालं एक मिनीट असे सांगीतले. मी त्यांना हटेलवर कोण नाही जातो की लवकर असे सांगीतले असता, त्यांनी साहेब काय म्हटले असे विचारुन तु सांग मी करतो म्हणलय कणी असे सांगीतले. त्यावर मी त्यांना आओ तुम्ही सांगा तर पहिला असे विचारले, त्यांनी पुढंची मला द्यायला पाहिजेत कणी असे सांगीतले, मी त्यांना तुम्ही सांगा तर फक्त असे विचारुन हातातील मोजणीची चलणे दाखवुन ही चलन काढली आहेत बारा बारा हजाराची असे सांगीतले, त्यावर आमचेत शेताचे मोजणी बाबत चर्चा झाली. विक्रम शिवदास हे दुसया व्यक्तीशी कामा संदर्भात बोलत होते. मी त्यांना जावु का थांबु असे विचारले असता त्यांनी मला मी काय सांगु तुला, माझ्याकडं काय हाय, तु किती देणार हायस् सांग मी बोलतो तेवढं त्यांच्याशी असे म्हणाले, त्यावर मी त्यांना सांगा तर, तुम्ही सांगीतल्या शिवाय कसं करणार असे विचारले, त्यावर त्यांनी काल सांगीतलय की, पन्नास हजार दे की, मी पण जरा देशाच्या बाहेर फिरुन येतो तुझ्या पैश्यावर असे म्हणुन माझी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला देणे करीता माझ्याकडे पन्नास हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर विक्रम शिवदास यांनी इतर लोकांशी त्यांचे कामा बाबत चर्चा करुन देवकर साहेब वर मिटींगमध्ये असल्याचे त्यांना सांगीतले. त्यावेळी मी त्यांना सांगा तर आकडा सांगा असे म्हणुन कमी करणे बाबत विनंती केली असता, त्यांनी निवासी नायब तहसिलदार देवकर साहेब यांचे नांव न घेता त्यांना वर जाऊन डायरेक्ट विचार असे मला सांगुन जाशील बिशील, मिटींग सुटेल लवकर असे सांगीतले, त्यावर मी त्यांना वर जातोय व्हय मी असे म्हणुन थांबु का बाहेर असे विचारले असता त्यांनी मला बस की इथ चहा पाजू का? माझा काय रोल आहे का? सांग, मला तुला अडवण्याचा काय उद्देश आहे का? माझ्या सेतु कडून काय अडवणुक झाल्या काय सांग, का कुठल्या पोराचा दाखला मारला नाही, किंवा लेट गेलाय अस काय आहे काय सांग असे म्हणाले, त्यावर मी त्यांना किती द्यायच ते तर सांगा असे विचारले असता, त्यांनी मला साहेबाच काय सांगता येत नाही रे असे म्हणाले, त्यावर मी त्यांना नांव तर ठेवा फक्त असे म्हणुन आकडा सांगणे बाबत विनंती केली, त्यानंतर विक्रम शिवदास यांनी मला त्यांचे मोबाईलवर पन्नास हजार रुपयेचा आकडा टाईप करुन बघ हे असे मी साहेबांकडे घेवुन जाईन, झालं तर झालं असे सांगीतलेने मी व पंच देसाई असे तेथून तळमजल्यावर देवकर साहेब बसतात त्या ठिकाणी आलो, देवकर साहेब त्यांचे केबीनमध्ये दिसले नसल्याने मी व पंच देसाई असे कार्यालयाचे बाहेर येवुन माझेकडील कारनें त्या ठिकाणावरुन निघून पुजारी साहेबांचे समक्ष हजर झालो.पुजारी साहेबांनी केले इशायावरून मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर त्यांचेकडे दिला. पुजारी साहेबांनी मला व पंच देसाई यंाना घडलेली हकिगत विचारली त्याप्रमाणे आम्ही हकिगत सांगीतली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकर्डर मधील पडताळणीचे वेळी ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण मी, पुजारी साहेब व दोन्ही पंचानी ऐकून खात्री केली. श्री. विक्रम शिवदास, सेतु कार्यालय कराड यांनी माझी भाची श्रीवा स्वाधीन माने हिचा कुनबी दाखला देणे करीता माझ्याकडे त्यांचेकरीता व निवासी नायब तहसिलदार देवकर साहेब यांचेकरीता 50,000/- रूपये लाचेची मागणी केल्याने पुजारी साहेबांनी विक्रम शिवदास याचे लाच मागणीमध्ये देवकर साहेबांचा सहभाग आहे काय याची पडताळणी करण्याचे निश्चित केले. पुजारी साहेबांनी मला व माझा मित्र तौसिफ शेख याला गोपनियता राखण्याच्या सुचना देवुन दि.15.09.2022 रोजी सकाळी साडे अकरा वाजणेचे सुमारास संगम हटेल कराडचे पार्कीगमध्ये हजर राहणेच्या सुचना देवुन जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही निघुन गेलो. त्यानंतर दि.15.09.2022 रोजी मी व माझा मित्र तौसिफ शेख असे माझेकडील कारने संगम हटेल कराडचे पार्कीगमध्ये दाखल झालो, त्यावेळी पुजारी साहेब, सापळा पथक व दोन्ही पंच शासकीय वाहनासह सदर ठिकाणी हजर होते. पुजारी साहेबांनी मला व मित्र तौसिफ शेख याला शासकीय सरकारी वाहनामध्ये बसणेच्या सुचना दिल्या, त्याप्रमाणे आम्ही सरकारी वाहनामध्ये जावुन बसलो, त्यावेळी मी पुजारी साहेबांना दि.14.09.2022 रोजी रात्री 10.00 वाजणेचे सुमारास, 11.00 वाजणेचे सुमारास व 11.30 वाजणेचे सुमारास विक्रम शिवदास यांचा मोबाईलवर फोन आला होता, परंतु सदर कल मी रिसीव्ह केले नसल्याचे सांगीतले. पुजारी साहेबांनी विक्रम शिवदास यांने मला नक्की कशा करीता कल केला होता, याची विक्रम शिवदास यांना कल करुन खात्री करुन घेण्याचे ठरवले. पुजारी साहेबांनी दिले सुचने प्रमाणे पंचांचे समक्ष माझे मोबाईल क्र 7720946464 वरुन विक्रम शिवदास यांचे मोबाईल क्र 9309797981 वर कल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला. विक्रम शिवदास यांनी रात्री कोल्हापुरला आलो असल्याचे सांगुन फोन केले बाबत सांगीतले. त्यावर मी त्यांना काल धावपळ झाली होती त्यामुळे लवकर झोपलो असल्याचे सांगुन कुठे आहे असे विचारले असता त्यांनी ऑफीसला असल्याचे सांगीतले. त्यावर मी त्यांना काय झाल काय असे विचारुन साहेब काय म्हणलेत काय याबाबत विचारले असता, त्यांनी कुठले साहेब असे मला विचारले त्यावर मी त्याना देवकर साहेब असे सांगीतले, त्यावर त्यांनी नाय माझी काय चर्चा झाली असे सांगीतले. त्यावर मी त्यांना दुपारी येत असल्याचे सांगीतले, त्यावर त्यांनी साहेबांना भेटण्यास सांगुन कल कट केला. आमचेमध्ये नमुद प्रमाणे झालेले मोबाईल वरील संभाषण पुजारी साहेबांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केले.विक्रम शिवदास यांने मला साहेबांना भेटण्यास सांगीतल्याने पुजारी साहेबांनी देवकर साहेबांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. पुजारी साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री गणेश धर्मा राठोड यांनी पंच नं 1 व श्री संदीप रंगराव देसाई यांनी पंच नं 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले. पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर बाबत माहिती दिली. दि.14.09.2022 रोजी सिलबंद केलेल्या लखोटामधुन मेमरीकार्ड बाहेर काढुन ते मेमरीकार्ड डिजीटल व्हाईस रेकर्डरमध्ये टाकले. पुजारी साहेबांनी मला व पंच राठोड यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे पावणे एक वाजणेचे सुमारास मी व पंच राठोड असे माझ्याकडील कारने रवाना होवून तहसिलदार कार्यालय कराड येथे गेलो. मी माझेकडील कार पार्कीग ठिकाणी पार्क करून मी व पंच राठोड असे देवकर साहेबांचे केबीन समोर गेलो. मी केबीनचे आतमध्ये डोकावुन पाहीले. आतमध्ये कोणी नसल्याने मी व पंच राठोड असे दोघे तीसरे मजल्यावरील सेतु कार्यालयात गेलो. वर्दी जबाब ता.31.10.2022

मी शुभम तानाजी बागडी, वय -33 वर्षे, व्यवसाय- हॉटेल, रा. एन.के प्लाझा फ्लॅट 104, सीपीआर हॉस्पीटल जवळ, कोल्हापुर, ता करवीर, जि. कोल्हापुर मोबाईल नंबर. 7720946464

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझी बहीण सौ स्नेहल हीचे मुळ गांव बेलवडे बुद्रुक ता कराड हे असुन ती व तिचे पती स्वाधीन माने असे त्यांचे कुटुंबासह ताराबाई पार्क कोल्हापुर येथे राहणेस आहेत. माझी भाची कुमारी श्रीवा हीचे नावाचा कुनबी दाखला काढण्यासाठी माझे दाजी स्वाधीन माने यांनी तहसिलदार कार्यालय कराड येथे सुमारे महीन्यापुर्वी अर्ज केलेला आहे. मी कोल्हापुर येथे राहणेस असल्यामुळे माझे बहीणीचे पती स्वाधीन माने यांनी मला भाची श्रीवा हीचा कुनबी दाखला तहसिलदार कार्यालय कराड येथून घेणे बाबत मला सांगीतले आहे. त्याप्रमाणे मी तहसिलदार कार्यालय कराड येथे जावुन दि.07.09.2022 रोजी भाची श्रीवा हिचे कुनबी सर्टिफिकेट बाबत निवासी नायब तहसिलदार आनंदराव देवकर यांची भेट घेतली त्यावेळी देवकर साहेबांनी मला सेतु कार्यालयातील विक्रम शिवदास यांची भेट घेण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी विक्रम शिवदास यांची भेट घेवुन भाची श्रीवा हिचे कुनबी दाखल्या बाबत चौकशी केली असता, विक्रम शिवदास यांनी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला तयार झाला नसल्याचे सांगुन त्याकरीता वेळ लागणार असल्याचे मला सांगीतले. त्यानंतर पुन्हा मी तहसिलदार कार्यालय कराड येथे जावुन विक्रम शिवदास यांची भेट घेवुन भाची श्रीवा हिचे कुनबी दाखल्या बाबत चौकशी केली असता विक्रम शिवदास यांने भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला देतो पण दाखल्यासाठी त्यांना व देवकर साहेबांना 50,000/- रुपये द्यावे लागतील नाही तर कुनबी दाखला मिळणार नाही असे सांगुन विक्रम शिवदास यांनी त्यांचे करीता व देवकर साहेबांचे करीता माझेकडे 50,000/- रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना पैसे देण्यास नकार दिला. त्यावेळी त्यांनी पैसे दिल्याशिवाय कुनबी दाखला मिळणार नाही असे मला सांगीतले. श्री.आनंदराव देवकर, निवासी नायब तहसिलदार कराड व सेतु कार्यालयातील विक्रम शिवदास हे माझ्याकडून पैसे घेतल्याशिवाय माझ्या भाचीचे नांवाचा कुनबी दाखला देणार नसल्याची माझी खात्री झाल्याने व मला आनंदराव देवकर व विक्रम शिवदास यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने माझा मित्र तौसिफ शेख यांने दि.13.09.2022 रोजी मा. राजेश बनसोडे साहेब पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली यांना संपर्क करुन तक्रार कळवली. त्यावेळी बनसोडे साहेबांनी सांगली युनिटचे अधिकारी पुढील कारवाई करतील व ते तुम्हाला संपर्क करतील असे मित्र तौसिफ यांना सांगीतले. त्यानंतर काही वेळात सांगली युनिटचे सुजय घाटगे साहेब यांनी संपर्क करुन पोलीस निरीक्षक श्री पुजारी साहेबांचा मोबाईल नंबर दिला.

दि.14.09.2022 रोजी पुजारी साहेबांनी तौसीफ शेख याला संपर्क करुन माहिती घेतली. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व मित्र तौसिफ याला गोपनियता राखण्याच्या सुचना देवुन कराड एस.टी. स्टॅन्डचे पाठीमागे येत असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे दि.14.09.2022 रोजी श्री. पुजारी साहेब त्यांचे पथकासह कराड एस.टी. स्टॅन्डचे पाठीमागील रोडवर आले होते. त्यावेळी मी व मित्र तौसिफ शेख यांनी त्यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. पुजारी साहेब यांनी त्यांचे सोबत आलेले दोन शासकीय पंच तसेच त्यांचा स्टाफ यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी श्री. आनंदराव देवकर, निवासी नायब तहसिलदार कराड व श्री विक्रम शिवदास, सेतु कार्यालय कराड यांचे विरूध्दचा लाच मागणी केले बाबतचा माझे हातास दुखापत झाली असल्याने माझा मित्र तौसिफ शेख यांने लिहीलेला तक्रारी अर्ज श्री. पुजारी साहेब यांना दिला. पुजारी साहेब यांनी मला त्यांचे ब्युरोच्या कार्यप्रणाली प्रमाणे सविस्तर माहिती दिली.पुजारी साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री संदीप रंगराव देसाई यांनी पंच नं 1 व गणेश धर्मा राठोड यांनी पंच नं 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर पुजारी साहेबांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला त्यांनी तो वाचून त्यावर सह्रा केल्या.

पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. पुजारी साहेबांनी मला व पंच देसाई यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे दुपारी चार वाजण्याचे सुमारास मी व पंच देसाई असे माझ्याकडील मारुती स्विफ्ट कार नं एम.एच. 09 ईयु 5657 मधुन रवाना होवून तहसिलदार कार्यालय कराड येथे गेलो. मी माझेकडील कार पार्कींग ठिकाणी पार्क करून मी व पंच देसाई असे तहसिलदार कार्यालयातील तिसरे मजल्यावरील सेतु कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी विक्रम शिवदास बसलेल्या खुर्चीच्या समोरील टेबलजवळ मी व पंच देसाई गेलो, सदर ठिकाणी लोकांची गर्दी होती. आम्ही काही वेळ थांबुन राहीलो. त्यानंतर मी विक्रम शिवदास याला आज लई कामात असाल तर उद्या येवु का? असे विचारले असता त्यांने मला झालं एक मिनीट असे सांगीतले. मी त्यांना हॉटेलवर कोण नाही जातो की लवकर असे सांगीतले असता, त्यांनी साहेब काय म्हटले असे विचारुन तु सांग मी करतो म्हणलय कणी असे सांगीतले. त्यावर मी त्यांना आओ तुम्ही सांगा तर पहिला असे विचारले, त्यांनी पुढंची मला द्यायला पाहिजेत कणी असे सांगीतले, मी त्यांना तुम्ही सांगा तर फक्त असे विचारुन हातातील मोजणीची चलणे दाखवुन ही चलन काढली आहेत बारा बारा हजाराची असे सांगीतले, त्यावर आमचेत शेताचे मोजणी बाबत चर्चा झाली. विक्रम शिवदास हे दुस-या व्यक्तीशी कामा संदर्भात बोलत होते. मी त्यांना जावु का थांबु असे विचारले असता त्यांनी मला मी काय सांगु तुला, माझ्याकडं काय हाय, तु किती देणार हायस् सांग मी बोलतो तेवढं त्यांच्याशी असे म्हणाले, त्यावर मी त्यांना सांगा तर, तुम्ही सांगीतल्या शिवाय कसं करणार असे विचारले, त्यावर त्यांनी काल सांगीतलय की, पन्नास हजार दे की, मी पण जरा देशाच्या बाहेर फिरुन येतो तुझ्या पैश्यावर असे म्हणुन माझी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला देणे करीता माझ्याकडे पन्नास हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर विक्रम शिवदास यांनी इतर लोकांशी त्यांचे कामा बाबत चर्चा करुन देवकर साहेब वर मिटींगमध्ये असल्याचे त्यांना सांगीतले. त्यावेळी मी त्यांना सांगा तर आकडा सांगा असे म्हणुन कमी करणे बाबत विनंती केली असता, त्यांनी निवासी नायब तहसिलदार देवकर साहेब यांचे नांव न घेता त्यांना वर जाऊन डायरेक्ट विचार असे मला सांगुन जाशील बिशील, मिटींग सुटेल लवकर असे सांगीतले, त्यावर मी त्यांना वर जातोय व्हय मी असे म्हणुन थांबु का बाहेर असे विचारले असता त्यांनी मला बस की इथ चहा पाजू का? माझा काय रोल आहे का? सांग, मला तुला अडवण्याचा काय उद्देश आहे का? माझ्या सेतु कडून काय अडवणुक झाल्या काय सांग, का कुठल्या पोराचा दाखला मारला नाही, किंवा लेट गेलाय अस काय आहे काय सांग असे म्हणाले, त्यावर मी त्यांना किती द्यायच ते तर सांगा असे विचारले असता, त्यांनी मला साहेबाच काय सांगता येत नाही रे असे म्हणाले, त्यावर मी त्यांना नांव तर ठेवा फक्त असे म्हणुन आकडा सांगणे बाबत विनंती केली, त्यानंतर विक्रम शिवदास यांनी मला त्यांचे मोबाईलवर पन्नास हजार रुपयेचा आकडा टाईप करुन बघ हे असे मी साहेबांकडे घेवुन जाईन, झालं तर झालं असे सांगीतलेने मी व पंच देसाई असे तेथून तळमजल्यावर देवकर साहेब बसतात त्या ठिकाणी आलो, देवकर साहेब त्यांचे केबीनमध्ये दिसले नसल्याने मी व पंच देसाई असे कार्यालयाचे बाहेर येवुन माझेकडील कारनें त्या ठिकाणावरुन निघून पुजारी साहेबांचे समक्ष हजर झालो.

पुजारी साहेबांनी केले इशा-यावरुन मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर त्यांचेकडे दिला. पुजारी साहेबांनी मला व पंच देसाई यंाना घडलेली हकिगत विचारली त्याप्रमाणे आम्ही हकिगत सांगीतली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण मी, पुजारी साहेब व दोन्ही पंचानी ऐकून खात्री केली.

श्री. विक्रम शिवदास, सेतु कार्यालय कराड यांनी माझी भाची श्रीवा स्वाधीन माने हिचा कुनबी दाखला देणे करीता माझ्याकडे त्यांचेकरीता व निवासी नायब तहसिलदार देवकर साहेब यांचेकरीता 50,000/- रूपये लाचेची मागणी केल्याने पुजारी साहेबांनी विक्रम शिवदास याचे लाच मागणीमध्ये देवकर साहेबांचा सहभाग आहे काय याची पडताळणी करण्याचे निश्चित केले. पुजारी साहेबांनी मला व माझा मित्र तौसिफ शेख याला गोपनियता राखण्याच्या सुचना देवुन दि.15.09.2022 रोजी सकाळी साडे अकरा वाजणेचे सुमारास संगम हॉटेल कराडचे पार्कींगमध्ये हजर राहणेच्या सुचना देवुन जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे आम्ही निघुन गेलो.

त्यानंतर दि.15.09.2022 रोजी मी व माझा मित्र तौसिफ शेख असे माझेकडील कारने संगम हॉटेल कराडचे पार्कींगमध्ये दाखल झालो, त्यावेळी पुजारी साहेब, सापळा पथक व दोन्ही पंच शासकीय वाहनासह सदर ठिकाणी हजर होते. पुजारी साहेबांनी मला व मित्र तौसिफ शेख याला शासकीय सरकारी वाहनामध्ये बसणेच्या सुचना दिल्या, त्याप्रमाणे आम्ही सरकारी वाहनामध्ये जावुन बसलो, त्यावेळी मी पुजारी साहेबांना दि.14.09.2022 रोजी रात्री 10.00 वाजणेचे सुमारास, 11.00 वाजणेचे सुमारास व 11.30 वाजणेचे सुमारास विक्रम शिवदास यांचा मोबाईलवर फोन आला होता, परंतु सदर कॉल मी रिसीव्ह केले नसल्याचे सांगीतले. पुजारी साहेबांनी विक्रम शिवदास यांने मला नक्की कशा करीता कॉल केला होता, याची विक्रम शिवदास यांना कॉल करुन खात्री करुन घेण्याचे ठरवले. पुजारी साहेबांनी दिले सुचने प्रमाणे पंचांचे समक्ष माझे मोबाईल क्र 7720946464 वरुन विक्रम शिवदास यांचे मोबाईल क्र 9309797981 वर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला. विक्रम शिवदास यांनी रात्री कोल्हापुरला आलो असल्याचे सांगुन फोन केले बाबत सांगीतले. त्यावर मी त्यांना काल धावपळ झाली होती त्यामुळे लवकर झोपलो असल्याचे सांगुन कुठे आहे असे विचारले असता त्यांनी ऑफीसला असल्याचे सांगीतले. त्यावर मी त्यांना काय झाल काय असे विचारुन साहेब काय म्हणलेत काय याबाबत विचारले असता, त्यांनी कुठले साहेब असे मला विचारले त्यावर मी त्याना देवकर साहेब असे सांगीतले, त्यावर त्यांनी नाय माझी काय चर्चा झाली असे सांगीतले. त्यावर मी त्यांना दुपारी येत असल्याचे सांगीतले, त्यावर त्यांनी साहेबांना भेटण्यास सांगुन कॉल कट केला. आमचेमध्ये नमुद प्रमाणे झालेले मोबाईल वरील संभाषण पुजारी साहेबांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

विक्रम शिवदास यांने मला साहेबांना भेटण्यास सांगीतल्याने पुजारी साहेबांनी देवकर साहेबांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. पुजारी साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री गणेश धर्मा राठोड यांनी पंच नं 1 व श्री संदीप रंगराव देसाई यांनी पंच नं 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले. पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली. दि.14.09.2022 रोजी सिलबंद केलेल्या लखोट्यामधुन मेमरीकार्ड बाहेर काढुन ते मेमरीकार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकले. पुजारी साहेबांनी मला व पंच राठोड यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे पावणे एक वाजणेचे सुमारास मी व पंच राठोड असे माझ्याकडील कारने रवाना होवून तहसिलदार कार्यालय कराड येथे गेलो. मी माझेकडील कार पार्कींग ठिकाणी पार्क करून मी व पंच राठोड असे देवकर साहेबांचे केबीन समोर गेलो. मी केबीनचे आतमध्ये डोकावुन पाहीले. आतमध्ये कोणी नसल्याने मी व पंच राठोड असे दोघे तीसरे मजल्यावरील सेतु कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी मला विक्रम शिवदास दिसले नसल्याने मी त्याचे बाबत तेथील हजर असले दुसरे इसमाकडे चौकशी केली असता त्यांनी ते आज आले नसल्याचे सांगीतलेने मी व पंच राठोड असे खाली येवुन माझेकडील कारने पुजारी साहेबांचे समक्ष हजर झालो.

विक्रम शिवदास व देवकर साहेब यांनी भेट झाली नाही परंतु मी विक्रम शिवदास यांना कॉल केला होता त्यावेळी त्यांनी ऑफीसमध्ये असल्याचे सांगीतले होते, परंतु ते ऑफीसमध्ये नसल्याने त्यांचे ठाव ठिकाण्याची माहिती घेणे करीता पुजारी साहेबांनी मला त्यांना कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेणे बाबत सुचना दिल्या, पुजारी साहेबांनी दिले सुचने प्रमाणे पंचांचे समक्ष माझे मोबाईल वरुन विक्रम शिवदास यांचे मोबाईलवर कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेतला. विक्रम शिवदास यांनी माझा कॉल रिसीव्ह केल्यानंतर मी त्यांना कुठे आहे साहेब असे विचारले असता त्यांनी धरी आहे बाबा, आम्हाला कोण येवुन देतय ऑफीसला असे सांगीतले, त्यावर मी त्यांना काओ असे विचारले असता त्यांनी मला तुलाच माहिती, काल तु काय केलस ते असे सांगीतले, त्यावर मी त्यांना काय केले असे विचारले असता, त्यांनी काय तुला माहित म्हंटलं की असे सांगीतले, त्यावर मी त्यांना काय ते तर सांगा असे विचारले असता त्यांनी तेच रं आम्ही प्रामाणीक कामं केलं र त्याच ते आम्हाला फळ मिळालं सांगुन ठेवु का असे म्हणुन कॉल कट केला. नमुद प्रमाणे माझेत व विक्रम शिवदास याचेत मोबाईल फोनवर झालेले संभाषण पुजारी साहेबांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

पडताळणी कारवाईमध्ये देवकर साहेबांची भेट झाली नाही परंतु विक्रम शिवदास यांने मला मोबाईलवर काल काय केलस माहित नाही का असे संभाषण का केले याचा खुलासा करुन घेणे करीता पुजारी साहेबांनी विक्रम शिवदास व देवकर यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरवले.

त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व मित्र तौसिफ शेख याला संपर्क केल्यानंतर संगम हॉटेल कराडचे पार्कींगमध्ये भेट घेण्याबाबत कारवाई बाबत गोपनियता राखण्याच्या सुचना दिल्या व जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे आम्ही निघून गेलो.

त्यानंतर दि.19.09.2022 रोजी माझा मित्र तौसिफ शेख यांने पुजारी साहेबांना संपर्क करुन माझी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला मिळाला नसल्याने दाखल्याचे चौकशी करीता तहसिलदार कार्यालय कराड येथे दि.20.09.2022 रोजी जाणार असल्याचे सांगीतल्याने पुजारी साहेबांनी मित्र तौसिफ शेख व मला संगम हॉटेल कराडचे पार्कींगमध्ये त्यांची भेट घेणे बाबत सुचना दिल्या, त्याप्रमाणे मी व मित्र तौसिफ शेख असे दोघांनी संगम हॉटेल कराडचे पार्कींगमध्ये पुजारी साहेबांची भेट घेवुन त्यांना आनंदराव देवकर व विक्रम शिवदास यांची भेट घेवुन त्यांचेकडे दाखल्याची चौकशी करणार असल्याचे सांगीतले. पुजारी साहेबांनी आनंदराव देवकर व विक्रम शिवदास यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरवले.

पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली. दि.15.09.2022 रोजी सिलबंद केलेल्या लखोट¬ामधुन मेमरीकार्ड बाहेर काढुन ते मेमरीकार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकले. पुजारी साहेबांनी मला व पंच राठोड यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे एक वाजणेचे सुमारास मी व पंच राठोड असे माझ्याकडील कारने रवाना होवून तहसिलदार कार्यालय कराड येथे गेलो. मी माझेकडील कार पार्कींग ठिकाणी पार्क करून मी व पंच राठोड असे देवकर साहेबांचे केबीन समोर गेलो. देवकर साहेब त्यांचे केबीनमध्ये नसल्याने आम्ही तीसरे मजल्यावरील सेतु कार्यालयात गेलो. सेतु कार्यालयात विक्रम शिवदास हे दिसले नसल्याने आम्ही खाली येवुन माझे कारने पुजारी साहेबांचे समक्ष हजर झालो.

देवकर साहेब व विक्रम शिवदास हे कार्यालयात हजर नसल्याने त्यांचेकडे पडताळणी करण्याचे पुजारी साहेबांनी ठरवले. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व मित्र तौसिफ शेख याला संपर्क केल्यानंतर संगम हॉटेल कराडचे पार्कींगमध्ये भेट घेण्याबाबत कारवाई बाबत गोपनियता राखण्याच्या सुचना दिल्या व जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे आम्ही निघून गेलो.

त्यानंतर दि.05.10.2022 रोजी माझा मित्र तौसिफ शेख यांने पुजारी साहेबांना संपर्क करुन माझी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला मिळाला नसल्याने दि.06.10.2022 रोजी तहसिलदार कार्यालय कराड येथे जावुन देवकर साहेब व विक्रम शिवदास यांची भेट घेणार असल्याचे सांगीतल्याने पुजारी साहेबांनी मित्र तौसिफ शेख व मला संगम हॉटेल कराडचे पार्कींगमध्ये त्यांची भेट घेणे बाबत सुचना दिल्या, त्याप्रमाणे मी व मित्र तौसिफ शेख असे दोघांनी दि.06.10.2022 रोजी संगम हॉटेल कराडचे पार्कींगमध्ये पुजारी साहेबांची भेट घेवुन त्यांना आनंदराव देवकर व विक्रम शिवदास यांची भेट घेवुन त्यांचेकडे दाखल्याची चौकशी करणार असल्याचे सांगीतले. पुजारी साहेबांनी आनंदराव देवकर व विक्रम शिवदास यांचेकडे पडताळणी करण्याचे ठरवले. पुजारी साहेबांनी त्यांचे सोबत असलेल्या दोन पंच साक्षीदारांची कांबळे व साखळकर अशी मला ओळख करुन दिली.

पुजारी साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री विकास पांडुरंग कांबळे यांनी पंच नं 1 व श्री प्रमोद अशोक साखळकर यांनी पंच नं 2 म्हणुन काम

करण्याचे ठरवले.
पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली. दि.20.09.2022 रोजी सिलबंद केलेल्या लखोट¬ामधुन मेमरीकार्ड बाहेर काढुन ते मेमरीकार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकले. पुजारी साहेबांनी मला व पंच कांबळे यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेबांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करून माझ्याकडे दिला. मी तो माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेबांनी दिले सुचनेप्रमाणे 12.15 वाजणेचे सुमारास मी व पंच कांबळे असे माझ्याकडील कारने रवाना होवून तहसिलदार कार्यालय कराड येथे गेलो. मी माझेकडील कार पार्कींग ठिकाणी पार्क करून मी व पंच कांबळे असे देवकर साहेबांचे केबीनचे समोर गेलो. देवकर साहेब त्यांचे केबीनमध्ये हजर होते. मी त्यांना आत येवु का असे विचारले, त्यांनी परवानगी दिल्यानंतर मी पंच कांबळे असे दोघे केबीनमध्ये गेलो. मी त्यांना दाखला पाहिजे असले बाबत सांगीतले. त्यावेळी देवकर साहेब यांनी दाखला तयार झाला असले बाबत मला सांगीतले. त्यांनी मला सेतुमध्ये जाण्यास सांगीतले. त्यावर मी त्यांना कुणाकडे जावु असे विचारले असता, त्यांनी सेतुमध्ये जावा तुमचा दाखला मागच तयार झाला असल्याचे मला सांगीतले. त्यावर मी त्यांना कुणाला भेटु असे विचारले असता, सदर केबीनमध्ये हजर असलेल्या दुस-या अनोळखी इसमाने सेतुमध्ये जावुन नांव सांगणे बाबत मला सांगीतले व देवकर साहेबांनी सेतु मधील रजिस्टरमध्ये तुमचे नांव असेल तुम्हाला दाखला मिळुन जाईल जावा असे सांगीतल्याने मी व पंच कांबळे असे देवकर साहेबांचे केबीनमधुन बाहेर येवुन तीस-या मजल्यावरील सेतु कार्यालयात गेलो. सदर ठिकाणी विक्रम शिवदास दिसुन आले नसल्याने तेथे हजर असलेल्या इसमाकडे शिवदास यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी शिवदास नसल्याचे सांगीतले. मी भाची श्रीवा हिचे दाखल्या बाबत त्यांचेकडे चौकशी केली. त्यानंतर सदर क्लार्कने मला दाखला चौदा तारखेला वगैरे नेला आहे काय याबाबत विचारणा केली. त्यावर मी त्यांना नकारार्थी मान हलवुन चौदा नऊला नेहला नसल्याचे सांगीतले. मी, पंच कांबळे व सदर क्लार्क असे पुन्हा खाली आलो. सदर क्लार्कने दाखल्या बाबत तहसिल कार्यालयातील दुसरे क्लार्क यांचेकडे चौकशी केली. त्यावेळी तहसिल कार्यालयातील क्लार्कने आपल्या इथं नोंद हाय शिक्का मारला होता ना असे आमचे सोबत आलेल्या क्लार्कला विचारले, त्यावेळी आमचे सोबत आलेल्या क्लार्कने त्यासाठीच आण्णाला बोलावलय खाली तो येतोय कुठे असे म्हणुन कशा नोंद हायत असे म्हणुन नोंदी बघुन दोनदा नोंदवला असले बाबत सांगीतले. त्यावर आमचे सोबत आलेल्या क्लार्कने मला तुम्हाला नोदवुन दिला होता ना दाखला अगोदर असे विचारले असता मी त्यांना देवकर साहेबाना भेटू का परत असे सांगीतले, त्यावर सदर क्लार्कने न्हाय न्हाय ज्यान फक्त घेतलय कणी त्याला फोन लावायच चालु हाय, त्याच काय होतय बघु त्याच्याकड असल तर कशाला डबल हे असा विषय चाललाय आमच्यात दोन मिनिट असे मला सांगुन त्यांनी कोणाला तरी फोन करुन दाखल्या बाबत माहिती घेतली आणि परत दुसरे इसमाला फोन करुन त्याला योगेश सरांचे जवळ येणेस सांगीतले, काही वेळात एक इसम आमचे जवळ आले व त्यांनी तहसिल कार्यालयातील क्लार्कला बोला की साहेब असे विचारले, तहसिल कार्यालयातील क्लार्कने आलेल्या इसमाला दाखला दिलता ना कुणबीचा, शिक्का मारलाय पिं्रट दिलाय असे विचारले, त्यावर सदर इसमाने दाखला वर, निलेश सरानी प्रिंट काढली दोन काढल्या हा मी काढलेली निलेश सरांनी मागितली तहसिलदार साहेबांनी मागितल्यावर असे सांगीतले, त्यावर तहसिल कार्यालयातील क्लार्कने ठिक हाय देवुन टाका असे आलेल्या इसमाला सांगीतले, त्यावर आलेल्या इसमाने शिक्का हाय, मारलेला न्हाय, तुम्ही येणार म्हणुन मारुन ठेवलेल होत तुम्ही आला न्हाय पिं्रट काढली आणि मला दिली असे तहसिल कार्यालयातील क्लार्कला सांगीतले, त्यानंतर आम्ही परत सेतु कार्यालयात गेलो, सदर ठिकाणी गेल्यावर आमचे सोबत आलेल्या क्लार्कने दाखला माझ्याकडे देवुन जावा असे सांगीतलेने मी व पंच कांबळे असे सदर ठिकाणावरुन माझेकडील कारने निघुन पुजारी साहेबांचे समक्ष हजर झालो.
पुजारी साहेबांनी केले इशा-यावरून मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर त्यांचेकडे दिला. पुजारी साहेबांनी मला व पंच कांबळे यांना घडलेली हकिगत विचारली त्याप्रमाणे आम्ही हकिगत सांगीतली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण मी, पुजारी साहेब व दोन्ही पंचानी ऐकून खात्री केली.
माझी भाची श्रीवा स्वाधीन माने हिचा कुनबी दाखला देणे करीता देवकर साहेबांनी माझेकडे लाचेची मागणी केली नाही. परंतु सेतु कार्यालयातील विक्रम शिवदास यांने माझेकडे भाची श्रीवा हिचा कुणबी दाखला देणे करीता पन्नास हजार रुपये लाचेची मागणी केल्याने सापळा कारवाईचे वेळ व ठिकाण निश्चित करणे करीता, पुजारी साहेबांनी विक्रम शिवदास यास कॉल करुन मोबाईल स्पिकर फोन मोडवर घेणे बाबत मला सुचना दिल्या, पुजारी साहेबांनी मी दिले सुचने प्रमाणे मी दोन पंचांचे समक्ष माझे मोबाईल वरुन विक्रम शिवदास यांचे मोबाईल वर कॉल करुन मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला. विक्रम शिवदास यांने माझा कॉल रिसीव्ह केला नाही. त्यानंतर पुन्हा एकदा विक्रम शिवदास यांना कॉल करुन मोबाईलचा स्पिकर फोन ऑन केला, परंतु विक्रम शिवदास यांनी माझा कॉल रिसीव्ह केला नाही.
माझी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला मिळाला असुन दि.15.09.2022 रोजी विक्रम शिवदास याचे ठाव ठिकाण्याची माहिती घेणे करीता केलेल्या संपर्कामध्ये विक्रम शिवदास यांने घरी असल्याचे सांगुन आम्हाला कोण येवुन देतय ऑफीसला, काल तु काय केलस, तुला माहित म्हंटलं असे संभाषण केले आहे व दि.06.10.2022 रोजी सापळा कारवाईचे वेळ व ठिकाण निश्चित करणे पुजारी साहेबांनी दिले सुचने प्रमाणे केलेले कॉल विक्रम शिवदास यांने रिसीव्ह केले नसल्याने तो माझेकडे मागणी केलेली पन्नास हजार रुपये लाच रक्कम माझेकडून स्विकारील याची शक्यता नसल्याने पुजारी साहेबांनी सदरची कारवाई स्थगीत करण्याचे ठरवले.
त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व माझा मित्र तौसिफ शेख असे आम्हा दोघांना शासकीय विश्रामगृह इस्लामपुर जि. सांगली येथे येणे बाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे आम्ही आमचेकडील कारने रवाना होवुन शासकीय विश्रामगृह इस्लामपुर येथे दाखल झालो. काही वेळात पुजारी साहेब व सापळा पथक असे सदर ठिकाणी आलो. पुजारी साहेबांनी मला शासकीय विश्रामगृहामध्ये बोलावुन घेतले. पुजारी साहेबांनी माझा सविस्तर जबाब नोंद केला.
तहसिलदार कार्यालय कराड येथील सेतुमधील विक्रम शिवदास यांने माझी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला देणे करीता माझेकडे 50,000/- रुपये मागीतलेने श्री. पुजारी साहेबांनी सदर कारवाई बाबत वरिष्ठ कार्यालयास अहवाल पाठवित असल्याबाबत मला सांगीतले होते. श्री पुजारी साहेब, पोलीस निरीक्षक, एसीबी सांगली यांनी मला संपर्क करून तहसिलदार कार्यालय कराड येथील विक्रम शिवदास यांचेविरूध्द गुन्हा दाखल करण्याबाबत वरिष्ठ कार्यालयातून परवानगी प्राप्त झाली असल्याचे कळवले.
मी दिले तक्रारी अर्जा वरुन श्री पुजारी साहेब पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली यांनी माझ्या तक्रारी अर्जाची पडताळणी केली असून दि.14.09.2022 रोजी तहसिलदार कार्यालय कराड येथील सेतु कार्यालयामधील विक्रम शिवदास यांने माझी भाची श्रीवा हिचा कुनबी दाखला देणे करीता स्वत: करीता व देवकर साहेबांचेकरीता माझ्याकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी केल्याने माझी तहसिलदार कार्यालय कराड येथील सेतु मधील विक्रम शिवदास यांचेविरुध्द फिर्याद आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Bhagwan RAMCHNDRA PATIL(I (Inspector)) / PSMH26077 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Bhagwan RAMCHNDRA PATIL

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PSMH26077

पोलीस स्टेशन ऑफिसर
कराड शहर पोलीस ठाणे
जि. सातारा.
दि. ३१/१०/2022